Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# भारतीय महिलांची विविध क्षेत्रातील प्रगतीची वाटचाल.... एक अवलोकन

**प्रा. डॉ. माधव कौतिक कदम**, पदवी, पदव्युत्तर व संशोधन मराठी विभाग, जी. टी. पाटील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नंदुरबार

## प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हापासून राष्ट्र उभारणी आणि राष्ट्रीय कार्याला वेगाने सुरुवात झाली आहे. महिलांनी या राष्ट्र उभारणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. भारत महासत्ता होण्यासाठी आणि विश्वगुरू होण्याच्या दिशेने जी वाटचाल सुरू आहे त्यात महिलांचे कर्तृत्वही लक्षात घेणे गरजेचे वाटते. महिला सबलीकरण, संरक्षण आणि महिलांचे संवर्धन याबाबतीत शासन सतर्क आहे. राष्ट्रीय विकासाच्या घटकांमध्ये महिला सशक्तिकरण महत्त्वाचे मानले गेले. महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाही याची जाणीव होऊ लागली आहे. नारीशक्तीच् महात्म्य ओळखणे म्हणूनच महत्त्वाचे. तिची अनेक रूपे आपल्याला समाजात पाहायला मिळतात. यावरून तिचे अस्तित्व, स्थान लक्षात येऊन तिच्या कर्तुत्वाची दखल घेणे काळाची गरज ठरते.

## संशोधनाची उद्दिष्टे

भारतीय महिलांचे वेगवेगळया क्षेत्रातील कर्तृत्व लक्षात घेणे. समाज व्यवस्थेवरील त्याचा परिणाम जाणून घेणे. स्त्रीच्या अंगी असलेली क्षमता, कर्तुत्व आणि कौशल्य लक्षात घेणे आणि ती समाजासमोर मांडणे हे या संशोधन पेपरचे उद्दिष्ट आहे.

## संशोधन पद्धती

प्राप्त माहितीच्या आधारे शोधणेबंधाची मांडणी करताना वर्णनात्मक आणि चिकित्सक विश्लेषण पद्धतीचा वापर करणे .त्या आधारे तिच्या राष्ट्र उभारणी कार्यातील किंवा सामाजिक बदलातील ,आर्थिक विकासातील निकषापर्यंत पोहोचणे हा यामागील उद्देश आहे.

## विषय विवेचन

एकविसाव्या शतकात असे एकही क्षेत्र नाही जिथे स्त्रियांनी आपले कर्तृत्व गाजवले नाही .अनेक क्षेत्रात स्त्रियांनी नेत्र दीपक कामगिरी केली तर अनेक क्षेत्रांमध्ये तिच्या नेतृत्वाखाली त्या क्षेत्राचा कायापालट झाला. साहित्य, चित्रपट, नाट्यकला, नृत्यकला, संगीत ,चित्रकला या क्षेत्राबरोबरच क्रीडा, शिक्षण, उद्योग, राजकारण, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. आपल्या कर्तृत्वाचा, नेतृत्वाचा बुद्धी कौशल्याचा ठसा उमटवलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघाने 1975 हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित केले 75 ते 85 हा काळ महिलादर्शक म्हणून जाहीर केला 1983 मध्ये विधी आयोगाची अंमलबजावणी झाली. 1990 मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाली. 1994 मध्ये महाराष्ट्र शासनाने पहिले महिला धोरण आणले. 2001 मध्ये राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण घोषित झाले. 2014 मध्ये त्यात सुधारणा केली. महात्मा गांधींनी भारतीय स्त्रियांमध्ये जागृती घडून आणून त्यांचा न्यूनगंड, भयगंड मुक्त करून आपणही देशासाठी काही करू शकतो हा विश्वास स्त्रियांमध्ये निर्माण केला. तर केवळ बाळाला जन्म देणारी आई नुसती आई नसते तर अनेक सुखांचा त्याग करणारी ती स्त्री असते ,असे पूज्य साने गुरुजी म्हणतात. यावरून महिला सक्षमीकरणाचे धोरण किती प्रभावी राबविले याची जाणीव


Copyright © | JET Network, All Rights Reserved

होते. या साऱ्या उदारमतवादी विचारसरणीतून महिलांनी आपलं पारंपारिक जीवन बदलून प्रत्येक क्षेत्रामध्ये आपला सहभाग नोंदवला. त्यातून आपल अस्तित्व आणि प्रभुत्व सिद्ध केले.

वर्धा जिल्ह्यातील एका गुराख्याच्या घरात जन्मलेली आणि वयाच्या दहाव्या वर्षीच तीस वर्षे वयाच्या पुरुषाशी लग्न करून परितक्त्या ठरलेली सिंधुताई सपकाळ यांना आपल्या चौथ्या गर्भवतीच्या काळात असताना घरातून हाकलून दिले जाते. एका गोठ्यात मुलीला जन्म दिला, मुलीला सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक रात्री स्मशानात काढल्यात .वयाच्या सत्तरीतही 42 वर्षापासून 1400 मुलांना दत्तक घेऊन अनाथांच्या माता होतात, त्यांचे हे कर्तृत्व देशाच्या सामाजिक आणि राष्ट्रीय कार्यात उजवे ठरते. 23 वर्षीय मुंबईची पूजा बिजारनिया रिलायन्स इंडस्ट्रीज मध्ये नोकरी करून उदरनिर्वाह करते .पण वडिलांना लिव्हर सोरायसिस झाला आणि त्यामुळे त्यांचे यकृत रिकामे झाले. पूजाला हे कळल्याबरोबर स्वतःच्या यकृताचा एक भाग देऊन वडिलांचे प्राण वाचविले .तेव्हा वंशाचा दिवा मुलगाच हवा अशा पुरुषप्रधान संस्कृतीत मुलगा पेक्षा मुलगी श्रेष्ठ हा संदेश देणारी पूजा सर्वांच्या लक्षात राहते. बीजमाता राहीबाई या विविध जातीचे बी संकलन करून पारंपारिक आणि आधुनिक संस्कृतीच शेतीतलं दर्शन घडवितात आणि पद्मश्री पुरस्कारापर्यंत पोहोचतात,कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यात व्हन्नुर या खेडेगावात राहणारी तानाजी निकम यांची पत्नी सगुना ही भाताची सर्वात उंच जात लावून तांदूळ उत्पादनात उच्चांक गाठते. शेतीमातीशी ईमान राखून भात उत्पादनात गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करणाऱ्या सगुनाबाई या कृषी पंढरीला प्रेरणादायी ठरतात. नाशिकच्या बाळासाहेब पवारांची कन्या मेघा ही रसायनशास्त्रात एमएससी होते. त्याचवेळी संगीत क्षेत्रात आवड असल्यामुळे संगीत विशारदही होते. लग्नानंतर मेघा बोरसे होऊन आडगाव ला सासरची शेती करते. शेतीत आधुनिक ज्ञानाच्या बळावर नवनवीन प्रयोग करताना फुलशेती फुलवते. या फुलांना जागतिक मार्केटमध्ये एक्सपोर्ट करते .तिच्या या कर्तुत्वाची दखल घेऊन केंद्रीय शिखर समितीवर सदस्य म्हणून तिची निवड होते. स्त्री म्हणून तिच्या कर्तुत्वाला नक्कीच वंदन केले पाहिजे. याच नाशिक जिल्ह्यातील सुरगाणाच्या डोंगर कपाऱ्यात हिरामण बागुल आणि त्यांची पत्नी तीन एकरात स्ट्रॉबेरी लावतात .आणि विदेशात स्ट्रॉबेरीची विक्री करतात. नासिक जिल्ह्यातीलच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील दलपत् पुर येथे छोट्याशा घरात राहणाऱ्या ताई बाई ब्राह्मणे सुरुवातीला ठाणापाडा आश्रम शाळा आणि नंतर भोसला विद्यालयात आठवीपर्यंत शिकून वयाच्या पंधराव्या वर्षी जमाईका येथे हुसेन बोल्ट याच्याबरोबर क्रीडा क्षेत्रातील प्रशिक्षण घेऊन नावलौकिक मिळवतात तर सावरपाडा एक्सप्रेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हजार बाराशे लोक बस्तीच्या सावरपाडा या आदिवासी पाड्यातील कविता राऊत ऑलिंपिक मध्ये धावते आणि आपल्या कुटुंबाचे, जिल्ह्याचे पर्यायाने देशाचे नाव लौकिक करते. नाशिकच्या दुर्गा देवरे या वयाच्या 18 व्या वर्षी विविध क्षेत्रात 50 पेक्षा जास्त बक्षीस मिळवतात. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ट्रॅकवर धावतात. गडहिंग्लज जवळील हासूर येथील शांताबाई यादव हे पती निधनानंतर आपला पारंपारिक हजामत करण्याचा व्यवसाय सुरू करतात. आणि स्त्री असूनही पुरुषप्रधान संस्कृतीच्या व्यवसायात आपला प्रवेश करून समाजापुढे, महिला वर्गपुढे एक वेगळा आदर्श निर्माण करतात. या साऱ्या महाराष्ट्रीयन महिला आपल्या विविध क्षेत्रातील कामगिरीमुळे राष्ट्र उभारणीच्या कार्यात योगदान देत आहेत.

नर्मदा आंदोलनाच्या निमित्ताने नंदुरबार जिल्ह्यातील प्रतिभा शिंदे यांचे विस्थापितांच्या प्रश्नावर अत्यंत धाडसाने सुरू असलेले कार्य देशाला प्रेरणादायी आहे. विसरवाडी पासून तेरा किलोमीटर अंतरावर


Copyright © | JET Network, All Rights Reserved

कोंडाईबारी घाटाच्या पायथ्याशी केवळ साडेचारशे कुटुंब असलेल्या जामनपाडा या आदिवासी गावातील मोल मजुरी करून उदरनिर्वाह भागवणाऱ्या 35 वर्षीय लताबाई खिमा गावीत यांचे स्वच्छता आणि हगनदारीमुक्त अभियानातील कार्य इतरांना प्रेरणादायी आहे. त्यांनी घरची आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्याने वडिलोपार्जित मिळालेले चांदीचे दागिने आणि मंगळसूत्र गहाण ठेवून आलेल्या 30 हजारात गावात पहिले शौचालय बांधले. आणि  नवापूर तालुक्यात हागणदारी मुक्त अभियानास प्रेरणादायी ठरतात. तर अक्काबाई रमेश ठाकरे या हात मजुरी करून स्वतःच्या आयुष्याची खडतर वाट तुडविणाऱ्या, महिला आरक्षणामुळे खानदेशातील पहिल्या लोकनियुक्त महिला सरपंच होतात. आणि शहादा तालुक्यातील म्हसावद  गावाचा सर्वांगीण विकासाला दिशा देतात .निर्मलाबाई रामदास कोकणी या नंदुरबार जिल्ह्यातील शितल पाड्याच्या. पण गरिबीवर मात करून आपण काहीतरी केले पाहिजे या विचारांनी शहरातील बाहेरपुरा परिसरात दहा बाय दहाच्या पत्र्याच्या शेड वजा झोपडीत राहतात. एक रीक्षा भाड्याने घेतात आणि रिक्षा चालक म्हणून जिल्ह्यातील पहिला महिला या व्यवसायात उतरतात. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून प्रथम वर्ष बीए च्या वर्गात शिकणारी दामिनी ही त्यांची मुलगी ही रिक्षा चालवते आणि आईलेक समस्त महिला वर्गाला प्रेरक ठरतात. अशीच प्रेरणा मुंबईच्या 26 11 च्या हल्ल्यात नऊ वर्षाच्या देविकावर कसाबने गोळी झाडली. ती गोळी तिच्या पायाला लागली .पायाच्या शस्त्रक्रिया झाल्यात .तिच्याच साक्षी मुळे कसाबला फाशी झाली. तिचे हे धाडस राष्ट्र कार्यासाठी ,भारताच्या सुरक्षिततेच्या क्षेत्रात महत्त्वाचे ठरते. भुसावळच्या नारखेडे महाविद्यालयात बारावीत शिकणारी सतरा वर्षीय  मसिराबी या कमी वयात 21 संशोधने करून दुचाकीत एसी लावल्याचे पेटंट प्राप्त करतात. राष्ट्रीय बाल पुरस्कार मिळवून आपलं कर्तृत्व सिद्ध करतात. मंजू यादव पती निधनानंतर तीन मुलांचा सांभाळ करण्यासाठी उत्तम हमाली करतात .नृत्य क्षेत्रात खानदेश कन्या गौतमी पाटील समाजाचं लक्ष केंद्रित करतात. नंदुरबारची पद्मावती कलाल,पनाखेड तालुका शिरपूर येथील निशा पावरा शिंदखेडा येथील वर्षा पावरा, हळदाणी तालुका नवापूर येथील शुभांगी शिंदे ,एसएसव्हीपीएस  महाविद्यालयात शिकून मोठी झालेली राजश्री खैरनार, ढेकू तालुका अमळनेर येथील नंदा पाटील, धुळे येथील मोनिका मोरे ,शिरपूर येथील माधुरी बोरसे या साऱ्या युवती पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक होऊन आपापल्या कार्यस्थळी आपलं कर्तुत्व, नेतृत्व जिद्दीने साकार करत आहेत .या साऱ्या महिला विविध क्षेत्रातल्या प्रेरक असून महाराष्ट्राच्या आणि भारताच्या विविध क्षेत्रातील प्रगतीच्या पाऊल खुणा ठरतात.. म्हणूनच महात्मा गांधी म्हणतात 'तुमची शक्ती जागृत झाली की तुमच्या सामर्थ्य येईल या देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे पुरुषांपेक्षाही अधिक निश्चयन कार्य करण्याची शक्ती तुमच्यात आहे.'(१) हे सत्य आहे. स्त्रीच्या कर्तुत्वाचा विचार करूनच' स्त्री ही संस्कृती रक्षक आणि संस्कृतीवर्धक असून भारतीय संस्कृती टिकविण्याचे कार्य स्त्रीनेच केलेले आहे.'(२)

**समारोप**

अशा रीतीने वेगवेगळ्या क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवणाऱ्या महिलांनी समाज व्यवस्थेत आपले स्वतःचे एक भक्कम स्थान निर्माण केले आहे. आपणही धाडसाच्या क्षेत्रात कामगिरी बजावू शकतो याचा आत्मविश्वास मुळातच आहे. कर्तृत्व गाजविण्याची क्षेत्रे मोकळी असले की त्याची संधी घेऊन ते क्षेत्र काबीज करू शकतात, यशस्वी करू शकतात याची जाणीव होते.

**निष्कर्ष**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

१) स्त्री अबला नाही ती सबला आहे हे तिच्या कर्तुत्वावरून सिद्ध होते.
२) राष्ट्रीय पातळीवर तिने आपल्या क्षमता आणि कौशल्याच्या बळावर आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.
३) देशाच्या सर्वच क्षेत्रात तिने आपल्या अस्तित्व सिद्ध केले आहे.
४) स्वतःचा शोध घेऊन ध्येयवादी विचार अमलात आणतात.
५) माणूस म्हणून जगताना कराव्या लागणाऱ्या संघर्षाची रूपे अभिव्यक्त होतात.
६) भारताच्या विविध क्षेत्रातील प्रगतीच्या वाटचालीत स्त्रीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ**

१. महात्मा गांधी विचार दर्शन- डॉ. पितांबर सरोदे, अंतरभारती अध्ययन अनुसंधान केंद्र धुळे, प्रथम आवृत्ती 2 ऑक्टोबर 2009.
२. मातृधर्मी साने गुरुजी- पु .ल. देशपांडे .आंतरभारती अध्ययन अनुसंधान केंद्र धुळे, द्वितीय आवृत्ती 2021.
३. लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण -डॉ.अशोक खैरनार व इतर .अथर्व पब्लिकेशन धुळे ,प्रथम आवृत्ती 20 ऑक्टोबर 2018.


Copyright © | JET Network, All Rights Reserved